-: प्रेसनोट दिनांक - १४/०१/२०१९ :-

**आरोपी लोकसेवक चंद्रकांत मारुती अस्वले, वय-४२, तलाठी इस्पुर्ली, ता.करवीर, जि.कोल्हापूर यांनी लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहात पकडलेबाबत.**

---

इस्पुर्ली ता.करवीर जि.कोल्हापूर येथील गट नंबर ५८३ मधील ४० गुंठे शेत जमीन तक्रारदार यांनी त्यांची पत्नी व भावजय यांच्या नांवे दिनांक १०/०१/२०१९ रोजी खरेदी केली आहे. त्या खरेदी केलेल्या जमीनीच्या सातबारा उता-यावर मुळ तक्रारदार यांच्या पत्नी व भावजय यांची नांवे लावणेकरीता तक्रारदार यांनी इस्पुर्ली गावचे तलाठी अस्वले यांची भेट घेवून खरेदी केलेल्या दस्ताची झेरॉक्स व त्या सोबत लेखी अर्ज दिला आणि सातबारा उतारा देणेकरीता विनंती केली. त्यावेळी तलाठी अस्वले यांनी मुळ तक्रारदार यांना खरेदी केलेल्या दस्ताप्रमाणे सातबारा उता-यावर त्यांच्या पत्नीचे व भावजेचे नांव लावणेकरीता २५,०००/- लाचेची मागणी केली. त्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक १४/०१/२०१९ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे तलाठी चंद्रकांत मारुती अस्वले, सजा इस्पुर्ली, ता.करवीर, जि.कोल्हापूर यांच्या विरुध्द तक्रार दिली.

तक्रारदार यांचे तक्रारी प्रमाणे दिनांक १४/०१/२०१९ रोजी गावकामगार तलाठी कार्यालय इस्पुर्ली या ठिकाणी शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणीमध्ये तलाठी चंद्रकांत अस्वले यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांनी इस्पुर्ली ता.करवीर जि.कोल्हापूर येथील गट नंबर ५८३ मधील ४० गुंठे शेत जमीन खरेदी केलेल्या जमीनीच्या सातबारा उता-यावर त्यांच्या पत्नी सौ.वैशाली प्रितम पाटील व भावजय सौ.सविता विवेकानंद पाटील यांची नांवे लावण्याकरीता एकुण २०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी काम पूर्ण होण्याच्या अगोदर पहिला हप्ता म्हणून १५,०००/- रुपये व कामपुर्ण झाल्यानंतर ५०००/- रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी पहिला हप्ता म्हणून लागलीच १५,०००/- रुपये तलाठी कार्यालय इस्पुर्ली येथे घेवून येण्यास सांगितलेचे पडताळणीमध्ये निष्पन्न झाले.

त्याप्रमाणे आज दिनांक १४/०१/२०१९ रोजी तलाठी चंद्रकांत अस्वले यांचेविरुध्द इस्पुर्ली तलाठी कार्यालयामध्ये सापळयाचे आयोजन केले असता तलाठी चंद्रकांत मारुती अस्वले यांनी तक्रारदार यांचेकडून पंच साक्षीदारा समक्ष १५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडणेत आले आहे. सदर घटनेबबाबत तलाठी चंद्रकांत मारुती अस्वले यांच्याविरुध्द इस्पुर्ली पोलीस ठाणे, ता. करवीर, जि.कोल्हापूर येथे गुन्हा नोंद करणेची प्रकीया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री.संदिप दिवाण पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री.राजकुमार गायकवाड, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री.गिरीश गोडे, पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांचे मार्गदर्शनानुसार श्री.प्रविण पाटील, पोलीस निरीक्षक, सहायक फौजदार, शामसुंदर बुचडे, पोलीस नाईक शरद पोरे, पोकॉ. रुपेश माने, कृष्णात पाटील व चालक पोहेकॉ. सुरेश अपराध, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

**२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**

**३)श्री.गिरीश गोडे , पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ८१०८६६०७०७, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**

**४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.**

**५)व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**